आरोग्य सेवा संचालनालय,
(महाराष्ट्र राज्य)
'आरोग्य भवन' सेंट जार्जेस रुग्णालय, आवार पी. डिमेला रोड, मुंबई - ४००००१

| कार्यालय | दूरध्वनी ०२२ | Website : http:// arogya.maharashtra.gov.in |
|---|---|---|
| संचालक | २२६२१०३१-३६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| सहसंचालक (अर्थव प्रशासन) | २२६२११८६ | Email : miscell@rediffmail.com |
| मुख्य प्रशासकीय अधिकारी | २२६२१९७३ | Email : aodesk2adhs@gmail.com |
| प्रशासकीय अधिकारी | २२६२६२०४ | |
| | क्रसंआसे/मवैआसे/२अ/टे-३/ वै.अ. गट - पदभरती८७७/ 1748 /१९<br>दि. 14 / 8 / २०१९ | |


विषय- महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट-अ यांच्या रिक्त असलेल्या ८७७ पदांच्या भरतीबाबत .

संदर्भ- शासन पत्र क्र. मवैअ- २०१९ / प्र.क्र. ४०८/सेवा-३, दिनांक ६ ऑगस्ट २०१९

उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट-अ यांच्या रिक्त असलेल्या ८७७ पदांची भरण्याबाबत दिनांक २३/७/२०१९ ते ३०/७/२०१९ पर्यत समुपदेशनाचा कार्यक्रम आरोग्य भवन, आरोग्य सेवा संचालनालय, सेंट जॉर्जेस रुग्णालय, आवार, मुंबई - ४००००१ येथील तळमजल्यावरील सभागृहात राबविण्यात आला. तथापि व्यापक प्रसिध्दी न मिळाल्याने अनेक उमेदवार उक्त कार्यक्रमासाठी उपस्थित न राहु शकल्याने काही प्रवर्गाच्या जागा रिक्त राहील्याने तसेच आरोग्य विभागास वैद्यकीय अधिकारी यांची निकड असल्याने संचालनालयाने दिनांक १२/०७/२०१९ रोजी प्रसिध्द केलेल्या २९९१ उमेदवारांच्या गुणवत्ता यादीतील जे उमेदवार समुपदेशनासाठी वेळापत्रकानुसार उपस्थित राहु शकले नाहीत केवळ त्याच उमेदवारांनी दिनांक २० ऑगस्ट २०१९ रोजी एक विशेष बाब म्हणुन समुपदेशनास उपस्थित राहावे.

जे उमेदवार दिनांक २३/७/२०१९ ते ३०/७/२०१९ या कालावधीत समुपदेशनासाठी उपस्थित राहिले होते व ज्या उमेदवारांनी पदस्थापना घेतली आहे अथवा नाकारली आहे अशा उमेदवारांना कोणत्याही कारणास्तव पुनश्च संधी देण्यात येणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

(श्री शैलेश रामचंद्र पाटणकर)
सहसंचालक, (प्रशासन)
आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

(मा. आयुक्त यांची मान्य टिपणी)

Scanned by CamScanner

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**वैद्यकीय अधिकारी गट अ ची पदे भरण्यासाठी**
**स्वंतत्र निवड मंडळ**

**जाहिरात क्रमांक ----------/२०१९ नस्ती क्र.मवैअ २०१८/प्र.क्र४०८/सेवा ३**

वाचा:- जाहिरात क्रमांक डीजीपीआयआर २०१८/२०१९/५२८९ दिनांक २७.१२.२०१८ रोजी प्रसिध्द.

वाचा येथे नमूद जाहिरातीनुसार महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-" अ" या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावर सरळ सेवेने पदभरती करण्यासाठी आरोग्य सेवा संचालनालयाचे **संकेतस्थळ** (website) http://arogya .mahashtra.gov.in यावर प्रसिध्द गुणवत्ता यादी व कार्यक्रमानुसार दिनांक २३.०७.२०१९ ते दि.३०.०७.२०१९ पर्यंत प्रत्यक्ष उपस्थित सर्व उमेदवारांचे समुपदेशन करुन पदभरती करण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक २७.१२.२०१८ च्या जाहिरातीत नमूद केलेल्या संवर्गनिहाय एकूण ८७७ पदांपैकी ७३० पदे भरण्यात आली आहेत. तथापि, सदर भरती प्रक्रियेत खालील तक्त्यातील प्रवर्गाची १४७ पदे अद्याप रिक्त रहात असल्याने संचालनालयाने पूर्वीच प्रसिध्द केलेल्या गुणवत्ता यादीतील जे उमेदवार समुपदेशनासाठी वेळापत्रकानुसार उपस्थित राहू शकले नाही, केवळ त्याच उमेदवांरासाठी दिनांक २०.०८.२०१९ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस हॉस्पिटल आवार, मुंबई येथे एक विशेष बाब म्हणून समुपदेशनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. तथापि, शिल्लक जागा असलेल्या खालील तक्त्यात नमूद संबंधित प्रवर्गातील उमेदवारांना त्वरित नियुक्ती देण्यात यईल. परंतु जागा शिल्लक नाही अशा प्रवर्गातील उमेदवारांचा प्रतिक्षा यादीत समावेश करुन त्या प्रवर्गाची जागा रिक्त झाल्यासच त्या रिक्त जागेवर त्यांना नियुक्ती देण्यात येईल

| वैद्यकीय अधिकारी गट अ वेतनश्रेणी १५६००-३९१००+ग्रेड पे ५४०० (सातव्या वेतन आयोगानुसार एस-२० रु.५६१००-१६६५००/-) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक २७.१२.२०१८ च्या जाहिरातीतील राहिलेली शिल्लक भरावयाची एकूण पदे | प्रवर्ग | | | | | |
| | इमाव (O.B.C) | | एसईबीसी (S.E.B.C.) | | विमाप्र (S.B.C.) | |
| | सर्वसाधारण | महिला | सर्वसाधारण | महिला | सर्वसाधारण | महिला |
| | ५ | १७ | ३४ | २४ | ४७ | २० |
| १४७ | २२ | | ५८ | | ६७ | |

- जाहिरातील परिच्छेद क्र.१० (८) मधील तरतूदीनुसार सबंधित उमेदवारांनी मुळ कागदपत्रासह व्यक्तीश: समुपदेशनास उपस्थित रहावे.

**स्थळ :- मुंबई**
**दिनांक :-**

(व.मुं. भरोसे)
उप सचिव तथा स्वतंत्र निवड मंडळाचे सदस्य सचिव,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
१०वा मजला, गो.ते. रुग्णालय, संकुल इमारत, मुंबई ४०० ००१

Scanned by CamScanner